# आचार्य विनोबा भावे यांचे सर्वोदयविषयी विचार

डॉ. संभाजी संतोष पाटील
(राज्यशास्त्र विभाग, प्रमुख)
श्री शि.वि.प्र.संस्था, धुळेचे साहित्य,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिंदखेडा जि. धुळे(महाराष्ट्र)

महात्मा गांधीजीच्या विचारांचा वारसा, त्याचे पुनरूज्जीवन करण्याचे कार्य आचार्य विनोबा भवे यांनी केले आहे. गांधीजींचा ''मानसपुत्र'' असा त्यांचा उल्लेख केला जातो. विनोबाजींना भूदान, सर्वोदय कल्पनेमुळे आधुनिक भारताचे संत, तत्वज्ञ, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचारवंत म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. तसेच 'परमाणु युगातील पहिला संत ' म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. अहिंसा व सर्वोदयाची तात्विक मांडणी आणि विज्ञानाला अध्यात्माची जोड घालण्याची भूमिका हे विनोबा भावे यांचे भारतीय विचारातील योगदान महत्वपूर्ण मानले जाते. हिमालयात साधनेसाठी जाण्यास निघालेल्या विनोंबांनी वाराणसी येथे महात्मा गांधीजींचे भाषण ऐकले. त्यांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित झाले. पुढे त्यांनी गांधीजींशी भेट घेऊन निष्ठापूर्वक ब्रम्हचर्याची प्रतिज्ञा करून विनोंबांनी जीवनसाधना सुरू केली. गांधीजींच्या अनुज्ञेने त्यांनी वाई येथे भारतीय परंपरा तसेच वैदिक संस्कृतीचा अभ्यास केला. केवळ दहा महिन्यातच त्यांनी वेदान्ताचा सखोल अभ्यास केला. भारतासाठी सतत आपला देह झिजविला. ज्ञानाचा दिवा सतत प्रकाशमय करण्याचे कार्य आचार्य विनोबा भावे यांनी केला.

**विषयाचे महत्वः**

1) महात्मा गांधी– ''अहिंसक मार्गाने सर्वांचे कल्याण साधणारी चळवळ म्हणजे सर्वोदय होय.''

2) आचार्य विनोंबा भावे– ''जातीय भेदभाव व पिळवणूक यांना थारा नसलेला तसेच सर्वांचा विकास साधणारा आणि सत्य , अहिंसा व साधनसूचीता यांच्या पायावर उभा असलेला नवा समाज म्हणजे सर्वोदय होय.''

''समाजाला उपलब्ध असलेल्या भौतिक , आर्थिक व अध्यात्मिक साधनांचा सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने अधिकाधिक उपयोग करून घेण्याचे सर्वोदय हे एक शास्त्र आहे. अधिकाधिकांचे अधिकाधिक सुख या उपयुक्तवाद्यांच्या मुळ सुत्रापेक्षा सर्वोदयाचे उद्दिष्ट अधिक व्यापक आहे. समाजातील प्रत्येकाचे वसर्वाचे कल्याण त्याला अपेक्षित आहे.''[1] सर्वोदयामध्ये सर्वांचे कल्याण अभिप्रेत असून जेरेमी बेथॅमच्या बहुजनांचे कल्याण या संकल्पनेपेक्षा व्यापक आहे. सर्वोदय ही विचारप्रणाली पूर्णतः भारतीय आहे. या विचार प्रणालीचा आधार वेद आहे. सर्वोदय हि विचारप्रणाली भारतीय जीवन पध्दतीच्या मूळ परंपरेवर आधारलेली आहे. फक्त भौतिक सुखामुळे व्यक्तिला सुख प्राप्त होत नाही. तर त्याला सुख प्राप्तीसाठी अध्यात्मिक सुख मिळणेही आवश्यक आहे. ''महात्मा गांधीच्या तत्वज्ञानातून निर्माण झालेला सिध्दांत , सर्वांच्या अभ्युदयाचा पुरस्कार करणारा, व्यक्तीची स्वायत्तता महत्वाची मानणारा, आर्थिक व सामाजिक समतेवर आधारलेल्या

शासनमुक्त समाजाचा आग्रह धरणारा सिध्दांत विनोबा व जयप्रकाशजी यांनी या सिध्दांताचा विकास केला. अधिकाधिक सुख या तत्वामध्ये समाविष्ट असून सर्वोदयाचे ध्येय व्यापक आहे.'2 सर्वांचे कल्याण हा सर्वोदयाचा सिध्दांत वास्तवात आणण्याची इच्छा विनोबांची होती. ते म्हणतात''By the learn Sarvodya is meant arising of all but not the arising of some and decline of other the concept of welfacre of all creatures is contained the term.''3 सर्वोदय समाजरचनेची कल्पना मांडतांना विनोबा भावे यांनी स्वराज्याची कल्पना मांडलेली आहे. त्यांनी स्वराज्यशास्त्रा बाबतचे विश्लेषण करतांना राज्य आणि स्वराज्य यात फरक असल्याचे सांगितले. अशा प्रकारचे स्वराज्य स्थापित होण्यासाठी त्यांनी काही गोष्टी सांगितल्या. त्यामध्ये 1) लोकांमधील बंधुभाव 2) सर्वांचा सर्वांगिण विकास 3) कमीत–कमी बंधने,4) अल्पसंख्यांक व बहुसंख्यांत यांच्या हिताची एकवाक्यता, 5) स्वयंस्फूर्त सहकार्य 6) सरकारी खर्च कमीत कमी असावा, 7) सत्तेचे केंद्रिकरण व्हावे. 8) राज्यपध्दती सर्वसामान्य लोकांना समजण्यासाठी असली पाहिजे. 9) ज्ञानाचा प्रसार व प्रसार सर्वत्र सतत होत राहावा इत्यादीचा समावेश होता. राज्य व स्वराज्य यात भेद केला पाहिजे. दिल्लीला चालविले जाते ते राज्य कारण ते इतरांकडून चालविले जाते. परंतु खेडेगावातील प्रत्येक व्यक्ति स्वतः होंऊन राज्य करते ते स्वराज्य अशा स्वराज्याची सर्वोदयवाद्यांना स्थापन करावयाची आहे. '' सर्वोदय विचार हा एक स्वतंत्र स्वयंभु विचार आहे. त्याची मुळे भारतीय संस्कृतीत खोलवर रूजली आहेत, त्यामुळे तो एक अमर, अक्षिण असा विचार आहे.''4

**सर्वोदयाची मूलतत्वेः**

1) अहिंसाः हिंसेच्या शक्तीवर सर्वोदयवाद्यांचा विश्वास नाही. प्रेम,अहिंसा यावर त्यांचा विश्वास आहे.विनोबानी सांगितले की, सर्वोदयी समाजाची कल्पना प्रत्यक्षात साकार होण्यासाठी अहिंसेशिवाय पर्याय नाही सर्वोदयी समाजातील लोक एकमेकांमधील मतभेद हिंसा व संघर्षमय मार्गाने  न सोडविता अहिंसा व मतपरिवर्तनाने सोडवतील. सर्वोदयामध्ये विशिष्ट वर्गाच्या हिताचा विचार न करता समाजातील सर्वांचे म्हणजे गरीब, श्रीमंत,मध्यमवर्गासह सर्वांचेच हित साध्य करणे हे उद्दिष्ट आहे. सर्वोदय ही चळवळ अहिंसात्मक समाजवाद प्रस्थापित करणारी चळवळ आहे. सर्वोदयी समाजातील अहिंसात्मक राज्यात सत्तेच्या राजकारणात स्थान न राहता समाजाची सेवा हा या राज्याच्या राजकारणाचा उद्देश असेल. राजनीतीचा जागार लोकनीती घेईल.

2) समानताः सर्वोदयी समाजामध्ये कोणत्याही प्रकारची असमानता राहणार नाही. कारण सर्वोदयाचे ध्येय हे सामाजिक व आर्थिक क्षेत्रामध्ये समानता प्रस्थापित करणे हे आहे. संपत्ती एकवटून विभागण्याच्या सर्व योजना राज्यव्यवस्थेत फार ताण देतात आणि शेवटी हिंसाश्रीत होऊन बसतात. म्हणून त्या त्याज्य ठरवून विकेंद्रीकरणाची पर्यायी योजना विनोबांनी सांगितली आहे. ग्राम हे त्यांच्या स्वप्नातील सर्वोदय समाजाचे एकक आहे. याविषयी ते सांगतात की,

कुटूंबात प्रस्थापित झालेले सामाजिक, आर्थिक, राजकीय व नैतीक समतेचे तत्व दिसून येते. कुटूंबीयांबद्दलची जी व्यक्तीची असते ते कुटूंबाबाहेर आपल्या गावच्या व्यक्तीविषयी दिसते. म्हणून एकतेची जाणीव कुटूंबापासून शेजाऱ्यापर्यंत अर्थात गावापर्यंत वाढविणे मनुष्याला सोयीचे होईल. शासनमुक्त समाजव्यवस्था स्थापन करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. विकेंद्रीकरणाची शेवटची मर्यादा गाव हे ठरविण्यात आलेले आहे. ग्रामोद्योगांच्या आधारे आर्थिक क्षेत्रातील विकेंद्रीकरण साध्य होईल म्हणून ग्र्राम हा एकक सोयीचा वाटतो.

3) आर्थिक विकेंद्रीकरणः सर्वोदयी समजात आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक विकेंद्रीकरण आवश्यक आहे. भांडवलशाहीत भांडवलदार–कामगार, शोषक –शोषित, श्रीमंत–गरीब असे वर्ग निर्माण होऊन समाजात वर्ग संघर्ष निर्माण होतो म्हणून मोठया उद्योगधंदयास सर्वोदयांनी विरोध केला आहे. मोठया उद्योगधंदयाऐवजी लहाना प्रमाणवरील उद्योगधंदे ज्यात किमान कौशल्यावर व हस्तव्यवसायावर आधारीत असणारे ग्रामोद्योग व कुटीरउद्योगांना ते प्राधान्य देतात. ग्रामीण भागात लहान–लहान उद्योगधंदयामुळे ग्रामीण बेरोजगारी व दारिद्रय नष्ट होण्याबरोबर जनतेस गावातीलच जीवनावश्यक वस्तू व सेवा उपलब्ध होऊन त्यांचे आर्थिक जीवन स्पयंपूर्ण व संपन्न होईल ग्रामोद्योगांना पाठींबा देण्यामागे समाजातील संपत्तीचे न्याय वाटप करणे व सर्वोदयी समाजात आर्थिक समता स्थापन करणे हे उद्देश आहे. विनोबाजी सर्वोदयवादी आर्थिक विकेंद्रीकरणाची कल्पना प्रत्यक्षात आणू इच्छितात.

4) शासनमुक्त समाजः शासनमुक्त समाज व स्वयंपूर्ण गावे ही सर्वोदयी समाजरचनेची उद्दिष्टे आहेत. शासनमुक्त समाज म्हणजे शासनहीन समाज नव्हे. सर्वत्र अंधाधुंदी, बेशिस्त माजवून जे अराजक निर्माण होते त्याला शासनमुक्त समाज म्हणता येणार नाही. शासनमुक्त समाज म्हणजे अशा समाजात काही लोक शास्ते व उर्वरित शासित असा प्रकार नसतो तर समाज व त्यातील प्रत्येक व्यक्ती ही स्वयंशासीत असते. सर्वोदयी विचारसरणी शक्तीचे राजकारण त्याज्य ठरविते. मानवी समाजाचा विकास राज्याकंडून होणे अशक्य आहे. अशी सर्वोदयाची भूमिका आहे. विनोबा भावे यांचा राज्याच्या शक्तीमय मार्गावर विश्वास नव्हता तर त्या ऐवजी सहकाराचे राजकारण अंमलात आणावे असे ते म्हणत.

5) कुटीरोद्योगः विनोबा भावे यांनी ज्याप्रमाणे मोठया उद्योगांच्या विकेंद्रीकरणावर भर दिला आहे त्याचप्रमाणे कुटिरोद्योगोवर भर दिलेला आहे. कुटिरोद्योगांमुळे खेडयांचा विकास मोठया प्रमाणात होत असतो. खेडयांमध्ये उद्योगधंदयाच्या निर्मितीमुळे तेथील बेकारांना काम मिळेल व त्यातुन गाव स्वावलंबी होण्यास मदत होईल म्हणून विनोबांनी कुटिरोद्योगांच्या विकासाचे तत्व स्विकारले आहे.

विनोबांनी सर्वोदयाबाबत असणारी भूमिका प्रत्यक्षात उतरविण्यासाठी भूदान, ग्रामदान, संपत्तीदान, ग्रामसंघटना व स्वराज्य यासारख्या कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी केलेली दिसून येते.

भूदान चळवळ हा गांधीप्रणीत सामाजिक व आर्थिक क्रांती घडवून आणण्याचा एक मार्ग आहे. विनोबाजींचे भूदान चळवळीचे स्वरूप नैतिक आहे. लोकांची मने आणि हृदय शुध्द करणे हा या चळवळीचा उद्देश आहे. ती एक शांततामय व अहिंसात्मक अशी क्रांती आहे. सर्व जमीन ही कोणत्याही व्यक्तीच्या मालकीची नाही. 'सब भूमी गोपालकी' हे हया चळवळीचे प्रमुख सुत्र आहे. भुदान चळवळीची सुरूवात 18 एप्रिल 1951 हया दिवशी करण्यात आली. देशातील भूमीहिनांच्या प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी पदयात्रा काढली. ते तेलंगणात गेले. लोक त्यांना फुल देत पण विनोबाजी त्यांच्याकडे माती मागत होते. ही जगावेगळी घटना त्यांची होती. दान न करणाऱ्या लोकांच्या मनातही दानशूरपणा आणण्याचे काम त्यांनी केले. भूदान आंदोलनाचे महत्व ओळखून आचार्य कृपलानी म्हणाले होते की, ''ते एक अध्यात्मिक आंदोलन आहे. ती आत्म्याच्या एकतेची विचारधारा आहे. ''5

ग्रामदान ही कल्पना सामूहिक मालकीवर आधारित आहे. ग्रामदानाचा अर्थ असा की, सर्व लोकांनी आपली जमिन संपूर्ण गावाला द्यावी म्हणजे जमिनीवर हक्क न राहता ती जमीन संपूर्ण समाजाच्या मालकीची होईल. मजूर व मालक ही कल्पना पुसली जाईल. प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक कृती ही समाजासाठी राहिल. जे उत्पादन होईल ते समाजाच्या मालकीचे राहिल आणि संपूर्ण खेडे म्हणजे एक कुटूंबच होईल असे खेडे आपले सर्व व्यवहार नियंत्रीत करेल. या ग्रमदानाच्या पायावरच ग्रामराज्याची उभारणी केली जाईल. भूदानयज्ञ यशस्वी होण्यासाठीच विनोबाजींना संपत्तीदान यज्ञ सुरू करावा लागला. संपत्तीचा उपयोग सर्वांना व्हावा अशी त्यामागची भूमिका आहे. त्यांनी सांगितले की, संपत्ती ही सामाजिक निर्मिती आहे. संपत्तीदानात संपत्ती घेणाऱ्याचा विकास होत असतो. तो संपत्तीदान करतो त्याला मानसिक शांती मिळते आणि दोघांमध्ये प्रेमाचे नाते निर्माण होत असते.

विनोबांनी सांगितले की, ग्रामदान म्हणजे स्वार्थत्याग नसून चांगले जीवन जगण्यासाठी केलेली गुंतवणूक आहे. अशी खेडयांचा कारभार एक समिती पाहिल. त्यात 15 ते 30 लोकांचा समावेश करण्यात येईल. त्या समितीवर ग्रामपरिषदेचे नियंत्रण राहिल अश परिषदेवर प्रत्येक कुटूंबातून एका व्यक्तीची निवड केली जाईल. हया ग्रमदानाचा पायावर ग्रामराज्याची उभारणी होईल. ज्यांना संपत्तीदान, ग्रामदान, भूदान करता येणार नाही त्यांनी श्रमदान केले पाहीजे आणि काही लोकांनी आपले आयुष्य सर्वोदयी कार्यक्रमासाठी खर्च करावयाचे ठरवून जीवनदान केले पाहिजे. त्यांनी सांगितले की, ग्रामदानातील गावाचे शासन ग्रामसमिती करणार असल्याने तेथे कोणत्याही प्रकारे निवडणूका असणार नाहीत व राजकारणही तेथे असणार नाही.

'स्वराज्य ' या शब्दाचा अर्थ केवळ 'परकीय सत्तेपासून सुटका' एवढयापुरताच मर्यादित नाही तर कोणत्याही स्वरूपाच्या बाहय नियंत्रणापासून मुक्तता व आत्मनियमनाच्याच कायद्याचे पालन असाही अर्थ 'स्वराज्य' संकल्पनेत अंतर्भूत आहे.बृहदारण्यक उपनिषदात स्वराज्य शब्दाचा

वापर नैतिक अस्तित्वाची स्वायत्तता किंवा प्रत्येक व्यक्तीचे स्वतःवर असलेले नैतिक नियमन या अर्थाने केलेला आहे. तो स्वराज्याचा अर्थ विनोबाजींनी स्विकारला आहे.

**मूल्यमापनः**

समाजामध्ये असणाऱ्या विविध प्रकारच्या विकृत्या , राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रकारच्या समस्या व सामाजिक प्रवृत्तीचा विचार केल्यास प्रस्तुत काळात समाजाला भौतिक आकर्षणापासून अशांतता, नैराश्य, व वैफल्याचा भावनेतून मुक्त करून उच्च मानवी जीवनाचा आविष्कार करण्याचा मार्ग सर्वोदय दाखवू शकेल. मानवी मूल्यांची जोपासना करण्यासाठी, मानवजातीच्या कल्याणासाठी भविष्यात सर्वोदयी मार्गाचाच स्विकार करावा लागणार आहे.

**संदर्भ ग्रंथः**


1) भोळे भा.ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲड कं. पब्लीशर्स, नागपूर द्वितीय आवृत्ती जून 2003 , पृष्ठ क. 449

2) व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास राज्यशास्त्र कोश दास्ताने रामचंद्र आणि कं. , पुणे प्रकाशीत 1987, पृ.क्र.337

3) देशपांडे श्रीकांत वि. भारतीय राजकीय विचारवंत, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर–10 प्रथम आवृत्ती 1992, पृ.क्र.32

4) देशपांडे निर्मला विनोबा,नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली चतुर्थ आवृत्ती , 2002 पृ.क्र.32.

5) देशपांडे श्रीकांत वि. भारतीय राजकीय विचारवंत, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर–10 प्रथम आवृत्ती 1992, पृ.क269